गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३८ वा ● शनिवार २४ जून २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 38 | Date : 24/06/2023 | blow : Saturday | Page 4 | Price 4

## हरी नामाच्या गजरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे जिल्ह्यात आगमन

### धर्मपुरी येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले पालखीचे स्वागत





पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी वारी सोहळ्यात विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन आळंदी येथून निघालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आज सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे आगमन झाले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी पालखीचे स्वागत करून माऊलीच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले.

धर्मपुरी येथे पालखी स्वागतासाठी पालकमंत्री श्री. विखे-पाटील यांच्यासह खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, परभणीचे खासदार संजय जाधव, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, आमदार राम सातपुते, आमदार जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू रजणीश कामत, अतिरिक्त जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, अकलूजचे उपविभागीय अधिकारी नामदेव टिळेकर, माजी आमदार रामहरी रूपनवर यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. माऊलीच्या पालखी स्वागतापूर्वी पालखी सोहळ्यातील अश्वाचे पूजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

**पालकमंत्र्यांनी केले सारथ्य** धर्मपुरी येथे पालखी स्वागतानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माऊलीच्या रथाचे सारथ्य केले. रथामध्ये त्यांच्या समवेत आमदार रणजितसिंह मोहिते पाटील,आमदार जयकुमार गोरे आणि जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर उपस्थित होते. पालखी स्वागतानंतर प्रशासनातील अधिकारी व लोकप्रतिनिधीनी हरी नामाचा गजर करीत पालखी सोहळ्याबरोबर पालखी विसावा ठिकाणापर्यंत चालण्याचा आनंद लुटला

**सातारा प्रशासनाच्या वतीने भावपूर्ण निरोप** सोलापूर जिल्ह्यात माऊलींच्या पालखीचे आगमन सकाळी १०.४० वाजता धर्मपुरी बंगला येथे झाले. तत्पूर्वी , सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खीलारी, पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी माऊलींच्या पालखीला भावपूर्ण निरोप दिला.

हरी नामात वारकरी तल्लीन

टाळी वाजवावी, गुढी उभी रहावी,

वाट ती चालावी पंढरीची

। पान २ वर

## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवाचा शानदार शुभारंभ

### राधा मंगेशकर आणि सहकारी मुंबई यांचा 'नक्षत्रांचे देणे, कार्यक्रम सादर





अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवाचा शानदार शुभारंभ न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि. २३ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातील प्रांगणात श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे पुरोहित मंदार पुजारी, श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी वे.शा.सं. श्री अण्णू महाराज, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, तहसिलदार बाळासाहेब शिरसाट, नूतन उपविभागीय पोलीस अधिकारी विलासराव यामावार, अक्कलकोट नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन पहिल्या पुष्पाचे उद्घाटन करण्यात आले.

दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर थोर संगित दिग्दर्शक व गायक पद्मश्री पंडीतजी हृदयनाथ मंगेशकर यांच्या मार्गदर्शनाखाली राधा मंगेशकर आणि सहकारी मुंबई यांचा 'नक्षत्रांचे देणे, कार्यक्रम सादर करण्यात आला. यांच्या समवेत डॉ.राजेंद्र दुरकर, विशाल गुंडतवार, ऋतुराज कोरे, शैलेश देशपांडे, विवेक परांजपे, यश भंडारे, मनीषा निचळ, केतन गोडबोले, सोनाली श्रीखंडे, शिरीष रामरीकर यांनी साथ दिली. या सर्व कलाकारांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

उद्घाटन सोहळ्यास उपस्थित मान्यवरांचा सत्कार अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते यथसांग मंत्र पठणाने श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

राधा मंगेशकर यांच्या नक्षत्राचे देणे या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयदेव जयदेव जय शिवराया, जय शिवराया, विश्वाचा..! जय ज्या स्वामी समर्थ..!, ऐरणीच्या देवा.., ही हिंदुशक्ती शंभु तेजा हे प्रभो शिवाजी राजा, मना रे...! नको लाजू..! आदी मराठी व हिंदी गाण्यांनी उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. मंडळाच्या ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवाचा शानदार शुभारंभास श्रोतेगणांची प्रचंड गर्दी झाली होती.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, अक्षता खोबरे, कोमल खोबरे, जयश्री मगर, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल मचाले, संपदा श्रीमान व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, भाऊ कापसे, मनोज निकम, विश्वस्त संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, प्रा. शरणप्पा आचलेर, शरणप्पा फुलारी, ओंकारेश्वर उटगे, अॅड.संतोष खोबरे, अरविंद शिंदे, योगेश पवार, अतिश पवार, प्रथमेश इंगळे, मनोज इंगोले, राजु नवले, सनी सोनटक्के, सागर गोंडाळ, पिटू शिंदे, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, अमित थोरात, किरण पाटील, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, प्रा.भीमराव साठे, भरत राजेगावकर, । पान २ वर

## भाजपाला सत्तेतून पायउतार करण्यासाठी पाटण्यात एकवटले देशातील १५ विरोधी पक्षनेते

पाटणा : येत्या लोकसभेच्या निवडणुकीतल देशातील सर्व विरोधी पक्षांनी एकत्रित येऊन भाजपला सत्तेतून पायउतार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंबंधी पाटण्यात आज मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली देशातील प्रमुख विरोधी पक्षनेत्यांची बैठक झाली. त्यामध्ये देशातील विरोधी पक्षांनी किमान समान कार्यक्रमाची तयारी करण्याचा निर्णय घेतला. तसेच या बैठकीत दिल्लीतील अध्यादेशावर काँग्रेसने राज्यसभेत आपच्या बाजूने समर्थन द्यावे अशी मागणी आज राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी केल्याची माहिती आहे.

मोदी हुकूमशाहप्रमाणे देशाचं नेतृत्व करत आहेत, त्यामुळे भाजपला सत्तेतून पायउतार करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले, ते म्हणाले की, भारताच्या मूलभूत विचारांवर आक्रमण केलं जात आहे, भारताच्या मूलभूत संस्थांवर हल्ले केले जात आहेत. ही विचारांची लढाई आहे. आमच्यातही काही मतभेद असतील पण सर्वांना एकत्रित करुन, सर्वांचे विचार घेऊन आम्ही एकत्रित जाणार आहोत. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी म्हणाल्या की, पाटण्यातून जी आंदोलनं सुरू झाली ती नंतर मोठी झाली हा इतिहास आहे. त्यामुळे ही बैठक दिल्लीत नाही तर पाटण्यात घेण्याचा विचार मी मांडला. आम्ही सर्व एक आहोत, आम्ही एकत्रित लढणार आहोत, आम्हीही देशभक्त आहोत, पण भाजपच्या हुकूमशाहीविरोधात आम्ही एकत्र येत आहोत. कुणी सरकारच्या विरोधात बोललं तर त्याच्याविरोधात ईडी, सीबीआय लावली जाते. पण देशातील वाढती महागाई, बेरोजगारी आणि इतर अनेक । पान २ वर

## सरकारचा मोठा निर्णय! आता पाचवी, आठवीच्या वार्षिक परीक्षेत विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होणे बंधनकारक

मुंबई : आता, पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. पुढील वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी पाचवी आणि आठवी वर्गाची वार्षिक परीक्षा विद्यार्थ्याला उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्य सरकारने अधिसूचना जारी केली आहे. याआधी पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा होत असे. मात्र, पुढील वर्षात प्रवेश घेण्यासाठी उत्तीर्ण होणे बंधनकारक नव्हते. राज्यात शालेय शिक्षणासाठी शिक्षण विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाने शिक्षण हक्क कायदा २०११ मध्ये सुधारणा केली असून, पाचवी आणि आठवीसाठी वार्षिक परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारने आज जारी केलेल्या आदेशानुसार, आता पुढील वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी पाचवी आणि आठवी वर्गाची वार्षिक परीक्षा विद्यार्थ्याला उत्तीर्ण होणे बंधनकारक असणार आहे. इयत्ता पाचवी आणि आठवी वार्षिक परीक्षेत विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास पुनर्परीक्षेचा पर्याय विद्यार्थ्याला देण्यात आला आहे. पुनर्परीक्षेतही विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण झाल्यास इयत्ता पाचवी आणि आठवी वर्गातच त्या विद्यार्थ्याला ठेवले जाणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या आदेशानुसार, पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना वयानुरूप वर्गात प्रवेश दिला जाणार आहे. सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरूप प्रवेश देताना पाचवीच्या वर्गासाठी निश्चित केलेली वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असणार आहे.विद्यार्थी पाचवीची परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्याला पाचवीच्याच वर्गात प्रवेश दिला जाईल. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेकडून । पान २ वर

## गायीच्या दुधाला किमान ३५ रुपये भाव आणि दुध भेसळी बाबतच्या राज्य सरकारच्या निर्देशांचे किसान सभेकडून स्वागत



मुंबई : गायीच्या दुधाला किमान ३५ रुपये भाव द्यावा, दुध भेसळ रोखावी असे निर्देश दुधविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी खाजगी व सहकारी दुध संस्थाना दिले आहेत. सरकारच्या या निर्देशाचे अखिल भारतीय किसान सभा आणि दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने स्वागत केले आहे. कोणतेही विशेष कारण नसताना महाराष्ट्रात दुध कंपन्यांनी गेल्या महिनाभरापासून दुधाचे खरेदी दर संगनमत करून पाडायला सुरुवात केली आहे. लंपी आजाराच्या पार्श्वभूमीवर देशभरात दुधाचे उत्पादन घटले असल्याने दुग्धपदार्थ आयात करावे लागतील असे केंद्रीय मंत्री सांगत असताना महाराष्ट्रातील दुध कंपन्यांनी मात्र महाराष्ट्रात दुधाचा महापूर आल्याचा कांगावा केला. त्यातून दुधाचे भाव ३८ रुपयांवरून पाडत ३१ रुपयांपर्यंत खाली आणले असल्याचा आरोप किसान सभेचे राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले यांनी केला आहे.

दुध दरांबाबतच्या आंतरराष्ट्रीय घडामोडी व कोविड सारख्या आपत्तींचा अतिरेकी बाऊ करून संगनमताने दुधाचे खरेदी दर पाडण्याचे प्रकार महाराष्ट्रात वारंवार घडू लागल्याने संपूर्ण दुध क्षेत्र अस्थिर बनले आहे. दुध उत्पादक यामुळे हैराण झाले आहेत. अशा पार्श्वभूमीवर दुध दरांबाबत किमान स्थिरता आणि संरक्षण मिळावे यासाठी दुध उत्पादक दुधाला उत्पादन खर्चावर आधारित एफ.आर.पी.चे संरक्षण मिळावे अशी मागणी करत होते. प्रत्यक्षात मात्र दरांबाबत असा कोणताही हस्तक्षेप करणे शक्य नसल्याचे । पान २ वर

## गौण खनिजाचे अवैध उत्खनन, वाहतूक करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करा : सहाय्यक जिल्हाधिकारी आव्हाळे

सोलापूर/प्रतिनिधीः गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीमुळे पर्यावरणाचा खूप मोठ्या प्रमाणामध्ये ऱ्हास होत आहे. याबरोबरच शासनाचा महसूल बुडत असल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. अशा प्रवृत्तींना आळा घालणे आवश्यक असून यासाठी गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करा, अशा सूचना सहाय्यक जिल्हाधिकारी मनिषा आव्हाळे यांनी दिल्या. उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर क्र -२ अधिनस्त तहसिल कार्यालय, अक्कलकोट, अपर तहसिल कार्यालय, मंद्रुप व तहसिल कार्यालय, दक्षिण सोलापूरच्या सर्व तहसिलदार व मंडळ अधिकारी यांच्या बैठकीत त्यांनी या सूचना दिल्या. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व मा. हरित लवादाचे निकष यांचे अवलोकन करावे, असे सांगण्यात आले. बैठकीत अवैधरित्या होत असलेल्या वाळू, मुरुम या गौण खनिजाच्या उत्खनन, वाहतूक व साठ्याबद्दल आढावा घेण्यात आला.

गौण खनिज चोरीची स्थळे शोधून अशा ठिकाणी मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील यांची संयुक्त स्थिर पथके, भरारी पथके तैनात करावीत. पथकाकडून गौण खनिजाची चोरी करणाऱ्यांवर दंडनीय तसेच मुद्देमाल जप्तीची कारवाई करावी.गौण खनिज उत्खनन, वाहतूक अगर साठा करणाऱ्यांवर शासन नियमातील तरतुदीनुसार फौजदारी व दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश श्रीमती आव्हाळे यांनी तहसिलदार व मंडळ अधिकारी यांना दिले.

## चुकीच्या गोष्टीचे समर्थन काँग्रेस कधीही करत नाही : प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे प्रतिपादन



अक्कलकोट/प्रतिनिधीः चुकीच्या गोष्टीचे समर्थन काँग्रेस कधीही करत नाही परंतु कायदा हातात घेऊन जे लोक उघड उघड शांतता बिघडवण्याचे काम करत आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी काँग्रेस पक्ष सातत्याने करत आहे पण पोलीस कोणाच्या दबावाखाली आहेत. नि: पक्षपाती ते कारवाई का करत नाहीत, असा सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. शुक्रवारी,पटोले हे स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी अक्कलकोट दौऱ्यावर आले होते.यानंतर काँग्रेस कार्यालयाला सदिच्छा भेट देत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.प्रारंभी सोलापूर रोडवरील हॉटेल प्रेसिडेंटजवळ शेकडो कार्यकर्त्यांनी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली प्रदेशाध्यक्ष नाना पटोले । पान २ वर

**भाजपने देश विकायला काढला काँग्रेसशिवाय देशाला पर्याय नाही. मागच्या साठ वर्षात काँग्रेसने देशाला उभे करण्याचे काम केले आहे तर भाजपने मागच्या नऊ वर्षात देशाला कर्जबाजारी केले आहे आणि मुठभर लोकांच्या स्वार्थासाठी देश विकायला काढला आहे त्यांना यांची जागा दाखवल्याशिवाय पर्याय नाही.**

**-नाना पटोले, प्रदेशाध्यक्ष**

**✲ सुविचार ✲**

अनिश्चतेत सर्व दुःख भरलेले असते.

# संपादकीय

## दक्षता घ्यावी लागेल..

गेल्या वर्षभराच्या कालावधीमध्ये या राज्यामध्ये अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडल्या आहेतच, पण आता या राज्याच्या राजकीय व्यासपीठावर नवनवीन खेळाडूंची एन्ट्री होऊ लागली आहे. गेल्या वर्षीच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील काही आमदारांनी उध्दव ठाकरे यांच्याबरोबर फारकत घेऊन भाजपसोबत घरोबा साधला. त्यानंतर राजकारणात एक वेगळी आघाडी तयार झाली. सध्या त्या युतीला भाजप-शिवसेना युती असेच नाव देण्यात येत आहे. आता तेलंगणाचे मुख्यमंत्री के.सी. राव यांनी आपल्या भारत राष्ट्र समिती या पक्षालाही महाराष्ट्रात रुजवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. गेल्या कित्येक महिन्यांपासून त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रामध्ये विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. गेल्यावर्षी जेव्हा राव यांनी आपल्या तेलंगणा राष्ट्र समिती या राजकीय पक्षाचे नाव बदलून भारत राष्ट्र समिती असे नाव केले तेव्हाच त्यांना देशातील इतर राज्यांमध्ये राजकारण करण्यातही रस असल्याचे समोर आले होते. पण इतर कोणत्याही राज्याकडे न वळता त्यांनी आपला मोहरा पहिल्यांदा महाराष्ट्राकडेच वळवला आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यातील नेत्यांचे नेहमीच महाराष्ट्रावर लक्ष असते. ज्या प्रकारे गेल्या काही वर्षांमध्ये ओवेसी बंधूंनी आपला एमआयएम हा पक्ष महाराष्ट्रात रुजवला, ते उदाहरण समोरच आहे. महाराष्ट्रातील मतदारांना नेहमीच राजकारणातील नवीन खेळाडूंचे आकर्षण असते की काय, अशी शंका येते. महाराष्ट्रातील कोणत्याही राजकीय पक्षासोबत आम्ही आघाडी किंवा युती करणार नसून स्वबळावर सर्व २८८ जागा लढवणार आहोत, अशी घोषणा राव यांनी केली आहे. म्हणजे आगामी विधानसभा निवडणुकीनंतर त्यांच्या अगदी कमी जरी जागा निवडून आल्या तरी अस्थिर राजकीय परिस्थितीमध्ये त्यांच्या पक्षाचे महत्त्व वाढू शकते याची जाणीव त्यांना आहे. महाराष्ट्रात गेल्या अनेक वर्षांपासून एकीकडे भाजप-शिवसेना यांची युती आणि दुसरीकडे काँग्रेसराष्ट्रवादी यांची आघाडी यांच्यामध्ये राजकीय संघर्ष होत असला तरी आता भारत राष्ट्र समिती असो किंवा अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष असो यासारखे नवनवीन राजकीय खेळाडू राजकीय व्यासपीठावर येत असतील, तर त्याची दखल कधी ना कधी प्रस्थापित राजकीय पक्षांना घ्यावीच लागणार आहे.

राजकारण ही विकासाची सर्व दरवाजे उघडणाऱ्या कुलुपाची किल्ली आहे असे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे. लोकप्रतिनिधी द्वारे लोकांचा सर्वांगीण विकास हा भारतीय संविधानाचे पालन करून होतो. लोकप्रतीनिधी हे धर्म, जात, पंथ निरपेक्ष आणि न्यायीक असायला पाहिजे तरच लोकप्रतीनिधींना महत्त्व प्राप्त होते. परंतु सध्या देशातील राजकारण एवढे मलीन आणि गढूळ करून ठेवले आहे की सर्वसामान्य लोक म्हणतात काहीही कर परंतु राजकारण व राजकारण्याच्या नांदी लागु नको. सर्व सामान्य लोकांच्या मनात राजकारण व राजकारणी लोक यांच्या बद्दल नकारात्मक भावना का निर्माण झाली असेल? यावरही मंथन करणे आवश्यक आहे. राजकारण हे लोक विकास व राष्ट्रहीत ह्याच मुद्यावर व्हायला पाहिजे होते परंतु मागिल काही वर्षापासून राजकारणाचे स्वरूप बदलले व जनहित आणि राष्ट्रहीत न बघता प्रतिनिधी चे हित आणि पक्षाचे हित बघायला सुरवात झाली. राजकीय लोकांची संपत्ती हजारो पटीने वाढून जनता मात्र गरीबी आणि महागाई ने होरपळून निघाली. सत्तर वर्षे होऊन गेले अनेक निवडणुका झाल्या अनेक आमदार खासदार झाले, अनेक वेळा सत्ता बदल झाले, दरवर्षी लाखो करोडो रुपयांचे बजट जाहीर होते परंतु लोकांची गरीब काय हटत नाही आणि लोकप्रतीनीधीची संपती घटत नाही. लोकप्रतीनीधी त्यांचे नातेवाईक यांचे कोणतेही काम कोणताही अडथळा न येता होते, परंतु सर्वसामान्य माणूस व शेतकरी रोज मारतो हेलपाटे. हि वस्तू स्थिती आहे. लोकप्रतिनिधी हे जनतेचे सेवक असतात, जनतेचे काम करणे त्यांचे नैतिक कर्तव्य असते. परंतु सामान्य माणसाचे काम होत नाही परंतु प्रश्न विचारला, कामाबद्दल विचारले, भ्रष्टाचाराबद्दल विचारले तर लोकप्रतीनिधी अरेरावी व मारण्याची भाषा करतो हे आजच नाही अनेक वर्षापासून घडत आहेत. जनतेचा सेवक असून जनतेवरच दमदाटी करून व पदाचा गैरवापर करून सर्व सामान्य माणसाचे आर्थिक व माणसिक शोषण केले जाते. आर्थिक शोषण म्हणजे केवळ पैशाची देवाण घेवाण नाही तर जनतेच्या वेगवेगळ्या योजनेच्या नावाखाली आलेला स्वतः कडे किंवा नातेवाईकाकडे वळवला जातो. यालाही आर्थिक शोषणच म्हणतात. लोकांचे काम करताना केलेला कामचुकार पणा निवडणुकीत मध्ये अपयश देऊ शकते म्हणून गोरगरीब लोकांना निवडणूक प्रक्रीयेच्या वेळी लोकांना शे पाचशे, हजार देऊन मत मिळवायची सुरुवात झाली. आणि हल्ली तर निवडणुकीत धर्म जात विषमता, द्वेष आणि पैसा असा सर्व बाबींचा समावेश करण्यात आला. लोकांमध्ये सामाजिक व धार्मिक विषमता निर्माण करून मताचे विकेंद्रीकरण करून स्वतः ची राजकीय पोळी भाजुन घेतली जाते. राजकीय पक्ष व नेत्यांचा निवडणूक अंजेडा हा शिक्षण, रोजगार, आरोग्य, महागाई व मुलभूत सुविधा संदर्भात असायला पाहिजे, पण वरिल सामाजिक

## तरुणांनी देशहिताचे राजकारण करावे..

मुद्यांची जागा धर्म, मंदिर, गाय, आणि इतर काही द्वेषात्मक बाबींनी घेतली. अर्थात एकही राजकीय नेता धार्मिक शिकवणीनुसार वागत नाही मात्र लोकांच्या मनात धर्माची भिती घालून इतरांबद्दल द्वेषाची भावना निर्माण केली जाते हे खुप भयानक आहे. धर्म, मंदिर, गाय या विषयावर जास्त लक्ष केंद्रित केल्याने देशातील शैक्षणिक पातळी घसरली, आरोग्य सुविधा घसरल्या, नोकऱ्या कमी झाल्या, महागाई व कर वाढले देशावर कर्ज वाढले. कर व कर्जातून मिळालेला पैसा नेमका खर्च कुठे केला जातो याचे गणित अजूनही सामान्य जनतेला समजण्या पलिकडे आहे. परंतु तरुणांनी राजकारणात सकारात्मक प्रवेश करून शिक्षण, रोजगार, आरोग्य, महागाई, मुलभूत सुविधा यावर लक्ष देऊन शिक्षण व संशोधनाच्या माध्यमातून जगाला आपली गुणवत्ता दाखवावी. अनेक जातीधर्माचे, पंथाचे, संस्कृती चे, वेशभूषा, खान पान सर्व काही वेगवेगळे असुनही आम्ही एक आहोत हा आदर्श जगासमोर पुन्हा एकदा निर्माण करावा. इतिहासाकडे बघितले तर आम्ही संत, महापुरुष, क्रांतिकारक यांना आजही वंदन का करतो तर त्यांनी वैयक्तीक हित न बघता जनता व देशहित बघितले होते आणि आपले आयुष्य खर्ची घातले. तेच संस्कार व परंपरा तरुणांना पुन्हा एकदा आत्मसात करून स्वहीत न बघता राष्ट्र हीत जनतेचे हीत बघुन राजकारण केले तर राजकारणात तयार झालेली घाण बाहेर जाईल. तरुणांना संधी मिळून नवीन नेतृत्व तयार होईल आणि आदर्श राष्ट्राची उभारणी होईल. स्वतः चे घर भरल्यापेक्षा ज्याचे आहे त्याला देणे ही नैतिक जबाबदारी आहे. आणि ज्याचा कडे नाही त्याला आपल्या कडचे देणे याला संस्कार कींवा धर्म म्हणतात. परंतु सध्या एकही नेता ज्याचे आहे त्याला मिळू देत नाही तर ज्याच्या कडे नाही त्याला कधी देईल? एकीकडे लोकप्रतिनींधीची भरभराट व एकीकडे सर्वसामान्य मानसाची जिवन जगण्याची तडजोड बघितली तर राजकीय नेत्यांचा खरा चेहरा लक्षात येईल. सर्व समिकरणे हाणुन पाडायची असतील तर तरुणांनी राजकारण सक्रिय होऊन जाती, धर्म, पंथ निरपेक्ष राजकारण करावे व सामाजिक हिता सोबत राष्ट्रहीत जोपासावे. नवीन आणि तरुण नेतृत्व म्हणजे आयुष्य भर बाप राजकारणात, बापानंतर मुलगा राजकारणात असे मुळीच नको. नवीन चेहरा, नवीन कृती नवीन विचार व नवीन निर्णय क्षमता असलेले सुशिक्षित तरुणांनी राजकारण जाऊन वयोवृद्ध लोकांना घरी बसवून त्यांना आराम करण्याची संधी द्यावी. हल्ली म्हाताऱ्या लोकांनी आराम करायचा देश चालवतात, आणि तरुणांनी देश चालवायला पाहिजे तर ते बेरोजगार म्हणून फिरतात म्हणून ज्यांना विस तिस वर्ष आमदार खासदार पदाचा अनुभव आहे त्यांना घरी बसवावे ते घरी जरी बसले तरी पेन्शन सुरु राहील परंतु तरुणांचे काय रोजगार नाही, सध्या काही लोक नोकरीवर लागले तर पेन्शन नाही. किमान नवीन नेतृत्व राजकारणात आले तर खुप मोठी क्रांती होईल परंतु हे सर्व करण्यासाठी तरुणांना सर्व बंधने तोडून देशहीत व जनतेचे हीत साध्य करण्यासाठी खुप मोठी मेहनत घ्यावी लागेल. मेहनतीने उभे केलेले साम्राज्य अनेक दिवस तटस्थ राहते, व इतिहास दखल घेते. आजच्या नेत्यांना वाटत असेल यांचे नाव इतिहासात अजरामर होतील परंपरा खुर्ची खाली झाली की यांना कोणीच ओळखणार नाही हेही खरेच आहे. परंतु यांनी केलेला भ्रष्टाचार, पसरवलेला द्वेष, बंद केलेल्या नोकऱ्या महाग केलेले शिक्षण सामान्य परिस्थिती मध्ये आणण्यासाठी खुप मोठा कालावधी लागणार आहे. लोकप्रतिनिधींच्या दहा पिढ्या बसुन खातील परंतु त्यांचे सामाजिक नाव खुर्ची गेल्यावर लयास जाईल हे सत्य आहे. इतिहास लिहला जातो तेव्हा दोन्ही बाजु बघितल्या जातात आणि इतिहास हा जाहीराती वर नाही पुराव्यावर असतो. हिटलर स्वतः ला खुप ताकदवान समजत होता. परंतु तो गेल्यानंतर पुन्हा हिटलर जन्माला येऊच नये असेच प्रत्येकाला वाटते. कारण ताकद, ज्ञान आणि पैसा कितीही असेल आणि तो जनतेने कल्याण करू शकत नसेल तर ते सर्वकाही कुचकामी होते. नवीन इतिहास घडवण्याची व आदर्श राष्ट्र निर्माण करण्याची गरज आहे त्यासाठी तरुणांनी एकत्र येऊन राष्ट्रहीत व जनकल्याणकारी अजेंडा राबवावा. जाती धर्माच्या नावावर वाद निर्माण करून राजकीय नेते व राजकीय पक्ष यांची कोणतीही हानी झाली नाही. परंतु धर्माच्या नावावर सर्वसामान्य तरुणांचे आयुष्य उद्धवस्त झाले आहे. आणि उद्धवस्त झालेले आयुष्यात आशेचा किरण म्हणून एकही नेता आधार देत नाही. राजकीय नेत्यांना वर्षाला पंचवीस लाख निव्वळ पगार जरी गृहीत धरला तरीही त्यापेक्षा शेकडो पटीने शिल्लक संपत्ती त्यांच्या कडे असते. शाळा, हॉटेल्स, बँका, कारखाने, शेतजमिनी, महागड्या गाड्या आणि निवडणुकीत करोडो रुपयांची उधळपट्टी हा पैसा नेमका येतो कुठून? हा सर्व सामान्य लोकांच्या करातून आलेला सर्वसामान्य माणसाच्या कल्याणासाठी आलेला पैसा असतो. वरील सर्व गोष्टी हानुन पाडायच्या असतील तर योग्य व सुशिक्षित तरुणांनी राजकारण सक्रिय होऊन लोकशाहीचा स्तंभ मजबूत करणे आवश्यक आहे. तरच हा देश पुन्हा एकदा सुजलाम सुफलाम होईल.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान रा. आरेगांव ता मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

**पान १ वरुन**

### हरी नामाच्या गजरात संतश्रेष्ठ ..

या संत वचनानुसार टाळ मृदंगाचा गजर आणि मुखाने हरिनामाचा जयघोष करीत वारकरी पालखी सोहळ्यात तल्लीन झाले होते. प्रत्येक वारकऱ्याच्या चेहऱ्यावर विठ्ठलाच्या दर्शनाची आस दिसत होती. विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने वारकरी पंढरीचे अंतर एक एक पाऊल जवळ करीत होता.

**वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज** पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकऱ्याला आवश्यक सेवा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी केली आहे. पालखी मार्गावर स्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशी शौचालये, आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. वारकरी भाविकांना वारीत कोणत्याही प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत यासाठी प्रशासनाने योग्यती खबरदारी घेतली आहे.

धर्मपुरी येथे पालखी अगमनापूर्वी सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने विविध जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात आहे. यामध्ये आरोग्य शिक्षण, लेक लाडकी, पर्यावरण रक्षण, प्रदूषण मुक्ती, स्वच्छ्ता या विषयांचा प्रामुख्याने समावेश होता.

**मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण** धर्मपुरी येथे माऊलीच्या पालखी स्वागतासाठी उपस्थित असलेल्या मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

पालखी सोहळ्यात आरोग्य विभागाने वारीमधील महिला वारकऱ्यांसाठी सॅनिटरी पॅड व स्तनदा मातासाठी हिरकणी कक्ष सेवा उपलब्ध करून दिली आहे. धर्मपुरी येथे आरोग्य विभागाने उभारलेल्या तात्पुरत्या अतिदक्षता कक्षास पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देऊन माहिती घेतली.

**दर्शनासाठी भाविकांची गर्दी** सोलापूर जिल्ह्यातील पालखी प्रवेशानंतर माऊलींची पालखी पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृह येथे विसाव्यासाठी थांबली असता पालखीच्या दर्शनासाठी परिसरातील वारकरी भाविक व ग्रामस्थांनी अलोट गर्दी केली होती.

**नातेपुते येथे पालखीचा मुक्काम** धर्मपुरी येथे विसावा घेतल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या मुक्कामासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलीची पालखी मार्गस्थ झाली.

### श्री स्वामी समर्थ अन्नछत्र ..

संजय गोंडाळ, सिद्धेश्वर हत्तुरे, दिनेश पटेल, राजशेखर उमराणीकर, कल्याणराव पाटील, प्रा.प्रकाश सुरवसे, अप्पू कलबुर्गी, विक्रांत गोरे, प्रशांत लोकापुरे, प्रतिष किलजे, धनराज शिंदे, श्रीकांत मलवे, विजय इंगळे,पिंटू दोडमनी, देवानंद परिचारक, वासू कडबगावकर, मैनुद्दीन कोरबू, सौरभ मोरे, वैभव मोरे, सोमनाथ सुतार, स्वामिनाथ गुरव, श्रीशैल कुंभार, राहुल इंडे, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, ज्ञानेश्वर भोसले, विनायक भोसले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले. या प्रसंगी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे पुरोहित मंदार पुजारी यांच्या वाढदिवसानिमित्त न्यासाच्या वतीने अभीष्टचिंतन करण्यात आले.

### भाजपाला सत्ततेतून पायउतार..

समस्यांवर काहीही बोललं जात नाही. जय २०२४ मध्ये पुन्हा भाजप सत्तेत आलं तर त्यानंतर देशात निवडणुका होणार नाहीत हे नक्की. भाजपला इतिहास संपवायचा आहे, पण आम्हाला इतिहास सुरक्षित ठेवायचा आहे, त्यामुळे आम्ही लढत राहू असं ममता बॅनर्जी म्हणाल्या.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले की, देशात सांप्रदायिक वातावरण करण्याचा प्रयत्न सुरु झाला आहे. आता आपल्याला भाजपचा सामना करायचा असेल तर एकत्र येऊन सामना करायला हवा. जे वाद होते ते बाजूला सामोरे ठेऊन आम्ही पूढे जात आहोत. जयप्रकाश यांच्या नेतृत्वात पाटण्यातून सूरू झालेलं आंदोलन देशात पोहचलं होतं. आता देखील हेच होताना पाहायला मिळेल. जम्मू काश्मीरमध्ये जी परिस्थिती आहे तीच परिस्थिती आता देशभरात आहे असं मेहबुबा मुफ्ती म्हणाल्या. गांधी-नेहरूंच्या विचाराच्या या देशाला वाचवण्याची गरज असल्याचंही त्या म्हणाल्या. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले की, आमची मत मतांतरे असतील, परंतु देश एक आहे. स्वातंत्र्यावर जो आघात करेल त्याला आम्ही मिळून त्याला विरोध करू. जे देशात तनाशाही आणायचं प्रयत्न करतील त्यांना आम्ही विरोध करत राहू. आता सातत्यानं बैठका होताना पाहिला मिळतील. विरोधी पक्षनेत्यांची पुढची बैठक ही शिमल्यात होणार आहे. त्याची तारीख अद्याप निश्चित नसली तरी ती १२ किंवा १३ जुलै असल्याचं सांगितलं जातंय. निवडणूक लढवण्यासाठी किमान समान कार्यक्रमाची निर्मिती करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

### गायीच्या दुधाला किमान ३५..

सरकारकडून सांगण्यात येत होते. अशा पार्श्वभूमीवर सरकार आता दराबाबत शेतकऱ्यांच्या बाजूने हस्तक्षेपाची भूमिका घेणार असेल तर ही स्वागतार्ह बाब आहे. दुध मंत्र्यांच्या किमान दराबाबत हस्तक्षेप करण्याच्या कृतीचे किसान सभा व दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती स्वागत करत असल्याचे डॉ. नवले यांनी म्हटले. प्राप्त परिस्थितीत दुधाला ३५ रुपये दर देण्याबाबत काही अडचणी आहेत का, हे तपासून पाहण्यासाठी समिती गठीत करण्यात येत असल्याचे दुग्ध विकास मंत्र्यांनी सांगितले आहे. प्रत्यक्षात अशा कोणत्याही समितीची आवश्यकता असण्याचे कोणतेही कारण दिसत नसल्याचे दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने म्हटले आहे. महाराष्ट्रातील दुध कंपन्या काहीही म्हणत असल्या तरी लंपी आजारामुळे देशातील दुधाचे उत्पादन घटले असल्याचे स्वत: केंद्र सरकारनेच जाहीर केले आहे. आवश्यकता पडली तर प्रसंगी विदेशातून दुग्धपदार्थ आयात करण्याची वेळ भारतावर येऊ शकते असेही केंद्रीय दुग्धविकास विभागाने जाहीर केले आहे. असे असताना एकट्या महाराष्ट्रातच दुधाचा महापूर कोठून आला हा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत. दुध उत्पादकांची लुट करण्यासाठी दुधाच्या महापुराचे बहाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नवे नाहीत. दुग्ध विकास मंत्र्यांनी ही बाब समजून घेत, समिती स्थापन करून कालहरण करण्यापेक्षा तत्काळ दुधाला ३५ रुपये दर देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी सुरु करावी अशी मागणी किसान सभेने केली आहे.

### सरकारचा मोठा निर्णय!

(एससीईआरटी) पाचवी आणि आठवीसाठीच्या वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा आणि मूल्यमापन कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार आहे.

विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर त्याला अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करण्यात येईल. वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांत त्याची पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. संबंधित विद्यार्थी पुनर्परीक्षेतही अनुत्तीर्ण झाल्यास त्याला पुन्हा पाचवी किंवा आठवीच्याच वर्गात ठेवले जाईल. प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेतून काढून टाकले जाणार नाही, असे नमूद करण्यात आले आहे.

वर्ष २००९ मध्ये लागू झालेल्या मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार, शाळांना आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करणे बंधनकारक होते. मात्र, यामुळे आठवी पुढील शिक्षणात विद्यार्थ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचा दावा करण्यात होता. त्यानंतर आठवीच्या विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्याची मागणी होऊ लागली होती.२००९ मध्ये शिक्षण हक्क कायदा लागू झाला तेव्हा ६ ते १४ वयोगटातील ८० लाख मुलं शालेय शिक्षणापासून वंचित होते.

### चुकीच्या गोष्टीचे समर्थन

यांचे फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोषात स्वागत केले आणि अक्कलकोट शहरातून पटोले यांच्या समवेत मोटरसायकल रॅली काढत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.यादरम्यान काँग्रेस कार्यकर्त्यांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला.पुढे बोलताना पटोले म्हणाले, देशातील आणि राज्यातील भाजपचे सरकार हे शांतता बिघडवण्याचे काम करत आहे.आज स्टेटसच्या कारणावरून राज्यात अनेक ठिकाणी दंगली होत आहेत. मारामारी होत आहेत कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे हे अशोभनीय आहे.निवडणूक आली की वाद-विवाद निर्माण करून मत मिळवायची आणि खोटे आश्वासन देऊन सत्ता मिळवायची हा भाजपचा धंदा झाला आहे.राज्यात बेकारी वाढलेली आहे लोकांना अन्न खायला मिळत नाही अशा परिस्थितीमध्ये हे लोक राज्यभर टिफिन बैठका घेत आहेत हे सरकार शेतकरी विरोधी आहे. मागच्या नऊ वर्षाच्या काळात भाजप सरकारने संविधानाचे तीन तेरा करण्याचे पाप केले आहे हे जनता कधीही विसरणार नाही. हुकूमशाहीचे राज्य आणले आहे.

सामान्य जनता यांच्या कामकाजाला वैतागली आहे. महागाई प्रचंड वाढलेली आहे. बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे केवळ अच्छे दिन आणण्याचे स्वप्न दाखवून जनतेची घोर फसवणूक झालेली आहे. नेहमी काँग्रेसने देशासाठी काय केले असा प्रश्न विचारला जातो.

सुईपासून ते रॅकेट पर्यंतची प्रगती ही काँग्रेसने केली आहे.कार्यकर्त्यांनी मनामधील न्यूनगंड कमी करावा आणि एकजुटीने लढून भाजपला नेस्तानाबुत करावे तरच देशाचे संविधान वाचू शकते.काँग्रेस हा शेतकऱ्यांचा पक्ष आहे तर भाजप इव्हेंट करणारा पक्ष आहे यांना शेतकऱ्यांचे काही देणे घेणे नाही.

आज राज्यात शेतकऱ्यांच्या हजारो आत्महत्या झालेल्या आहेत पावसाचा पत्ता नाही खरीप हंगाम वाया जाण्याची वेळ आलेली आहे.यात शेतकऱ्यांना दमडीची मदत नाही सरकार शेतकऱ्यांविषयी खूप काही करत असल्याचे केवळ भासवीते पण प्रत्यक्षात काहीही नाही.राज्यातील सरकार घालवण्यासाठी मी अक्कलकोटला आलोय. केंद्रात व राज्यात जुलमी सरकार आलेले आहे.सत्ता उलथविण्यासाठी श्री स्वामी समर्थांना साकडे घातले असल्याचे शेवटी ते म्हणाले.राज्यात भाजपचे सरकार जाऊन आगामी काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.

त्यामुळे अक्कलकोटची जागा काँग्रेसला जिंकून आणण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी करावा,असे आवाहन त्यांनी केले.राज्यातील शिंदे फडणवीस सरकारच्या कारभाराचा पर्दाफाश आम्ही करणार आहोत.दोन दिवसात त्याचे राज्य स्तरावर नियोजन होईल.प्रत्येक तालुक्यात काँग्रेस पक्ष तालुका निहाय जाहीर सभा घेऊन शेतकरी विरोधी सरकारचा पाढा वाचणार आहे.

त्यावेळी मी पुनः अक्कलकोटला येणार आहे,असेही ते म्हणाले.प्रारंभी काँग्रेस कार्यालयानंतर अक्कलकोट काँग्रेस कमिटीच्यावतीने काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष अशपाक बळोरगी व शहराध्यक्ष रईस टिनवाला यांनी पटोले व अन्य मान्यवरांचे स्वागत करून सत्कार केला.यावेळी एबी ग्रुपचे अतिक बागवान,अजीम अत्तार यांनी आपल्या असंख्य कार्यकर्ते काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते पाटील, तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, बाजार समितीचे माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे,काँग्रेसच्या महिला तालुकाध्यक्ष शितल म्हेत्रे, माजी आमदार विश्वनाथ चाकोते,विजयकुमार हत्तुरे, पंडित सातपुते, अभिराज शिंदे,लाला राठोड,सिद्धार्थ गायकवाड,मुबारक कोरबू,मेनोद्दीन कोरबू,शिवराज स्वामी, सरफराज शेख, शबाब शेख,अलिबाशा अत्तार, सद्दाम शेरीकर, रोहिदास राठोड,विश्वनाथ हडलगी आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या दौऱ्यात त्यांनी कार्यकर्त्यांसमवेत अक्कलकोट वटवृक्ष देवस्थान,श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाला भेट दिली तसेच ग्रामदैवत हजरत पीर ख्वाजा दाऊद दर्ग्याला भेट देऊन दर्शन घेतले आणि शुभेच्छा दिल्या.

## तुरुंगातील कैद्यांना आता कॉईन बॉक्स बंद, स्मार्ट कार्ड सुरु; कैद्यांसाठी नवीन उपक्रम

मुंबई : महाराष्ट्रातील तुरुंगातील कैद्यांना आता कॉईन बॉक्स नाहीतर त्यांच्या नातेवाईकांशी स्मार्ट कार्ड फोनद्वारे संवाद साधण्याची सुविधा मिळणार आहे. येरवडा मध्यवर्ती कारागृहाने या नाविन्यपूर्ण सेवेची चाचणी घेण्यात येत आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षक (तुरुंग आणि सुधारात्मक सेवा), अमिताभ गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली ही सुविधा सुरु करण्यात आली आहे. हा उपक्रम यशस्वी झाल्यास, स्मार्ट कार्ड फोन उपक्रम संपूर्ण राज्यात राबविण्यात येईल. कैद्यांना त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधण्यासाठी कॉईन बॉक्स देण्यात आला होता. मात्र, बाजारात कॉईन बॉक्सेसची उपलब्धता नसल्याने आणि त्यांची दुरुस्तीची सोय नसल्याने ही यंत्रणा जीर्ण झाली होती. शिवाय, विविध सुविधा बंद केल्यामुळे कैदी आणि त्यांच्या कुटुंबीयांमधील संवादात अडथळा निर्माण झाला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# महेश इंगळेंच्या व्यक्तिमत्वात भक्ति सेवा समर्पणाचे प्रतिबिंब : आदेश बांदेकर



अक्कलकोट/प्रतिनिधी : भक्ती, करुणा, दया, अस्मिता आत्मीयता ही पंचसुत्री श्री स्वामी समर्थांच्या अंतरंगात वसलेली खूप मोठी शक्ती आहे. यामुळे स्वामींच्या देहरुपी अवतार कार्यात त्यांचे अनेक भक्तगण उदयास आले. शेवटी येथील श्री वटवृक्ष मंदिरातील वटवृक्ष खाली त्यांनी निवास करून अनेक दिनदुबळ्यांच्या जीवनाचे कल्याण केले. त्यांच्या या अगम्य लिलांमुळे स्वामी समर्थांची माहिती जास्तीत जास्त भाविकांमध्ये प्रचलित झाली. स्वामींच्या महिमेचा, त्यांच्या कार्याचा, प्रचार प्रसाराचा जास्तीत जास्त विस्तार व्हावा, याकरीता येथील वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मंदिर समिती नेहमीच प्रयत्नशील असते. अशा या पवित्र धार्मिक स्थळावर मंदिर समितीचा प्रमुख म्हणून काम करताना जीवनात अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो. याचा कानमंत्र मंदिर समितीचे तत्कालीन चेअरमन कै. बाळासाहेब इंगळे यांनी विश्वस्त पदाधिकाऱ्यांना दिले आहे, म्हणून त्यांच्या पावलावर पाऊल ठेवूनच स्वामी सेवेचे व्रत जोपासलेले महेश इंगळे यांच्या व्यक्तिमत्त्वात भक्ती, सेवा, समर्पणाचे प्रतिबिंब दिसत असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध मराठी सिनेकलाकार आदेश बांदेकर यांनी केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी आदेश बांदेकर यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी बांदेकर बोलत होते. पुढे बोलताना बांदेकर यांनी श्री स्वामी समर्थांनी समाधी घेऊन जवळपास आता १४५ वर्षे पूर्ण होत झाली आहेत. स्वामींच्या अवतार कार्यापासून आजपर्यंत येथे अनेक स्वामी भक्त वटवृक्ष मंदिरात स्वामी चरणी नतमस्तक झाले. मंदिर समितीकडून वेळोवेळी स्वामी भक्तांना सर्वोत्तम स्वामी सुविधा पुरविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न झाला व होत आहे. आता गेल्या अनेक वर्षापासून अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हाती मंदिर समितीचे सूत्रे आल्यानंतर मंदिर गाभारा परिसर नूतनीकरण, भव्य परिसर सुशोभीकरण, मंदिरातील स्वच्छता, स्वामी भक्तांना स्वामींचे दर्शन घेणे कामी होणारे सहकार्य या सर्व कार्यातून महेश इंगळे यांच्या कार्याची प्रचितीही येते असेही प्रतिपादन बांदेकर यांनी शेवटी व्यक्त केले. याप्रसंगी आदेश बांदेकर यांच्या समवेत असलेले महेंद्र कदम, मारुती शिंदे, सुशीलकुमार गंगावणे, कैलास तवळे, मल्हार साळवी, अभिषेक राणे, कुमार साळुंखे, नागेंद्र उपाध्याय, राजू गायकवाड, पूनम घुले, भाग्यश्री गायकवाड, सागर शिंदे, जितेंद्र घाग, प्रदीप घाग, दिलीप सिंग, राजेश नार्वेकर,सतीश काळे, मिथिलेश साव, संदीप दळवी,अवदुत कांबळे, संतोष राणे, श्रीरंग परळकर, दिनेश इंदे यांचाही महेश इंगळेंनी स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन सन्मान केला. यावेळी मंदिर समितीचे विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, शिवशरण अचलेर, गिरीश पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, ऋषिकेश लोणारी इत्यादी उपस्थित होते.

# वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट कडून महा–ई–सेवा केंद्रावर कारवाई करण्या बाबत तहसीलदार यांना निवेदन




अक्कलकोट/प्रतिनिधीः गेल्या अनेक दिवसापासून सेतू कार्यलय ऑफिस बंद झाल्यापासून अक्कलकोट तालुका असेल किंवा शहर असेल अश्या ई महा सेवा केंद्रात अक्षरशः लूटीच धुमाकूळ माजल आहे ना कुणी दाद ना पुकार झाल्यागत अवस्था झाले आहे, वरून काही नागरिक विचारलं कि इतकं द्यावंच लागेल अशी बेमालूमात भाषा वापरली जाते. तालुक्यातील काही ई –महा सेवा केंद्रा मध्ये दर फलक नाही.सध्या पाऊस पाणी न आल्याने शेतकरी,सर्व सामान्य नागरिक,गोरगरीब विध्यार्थी आर्थिक बिकट परिस्थिती तुन जात असताना कोणत्याही शासकीय दाखला काढायचं म्हणल कि त्याची फ्री शासकीय ३०/३५ दर असताना १५०/२००/५००रुपये पर्यंत लूबडणूक केली जात असून याला गोरगरीब जनता त्रासली असून वैतागले आहे, अक्ककोट वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्ष श्री चंद्रशेखर मडीखांबे यांच्या मार्गदर्शन खाली निवेदन अक्कलकोट तहसीलदार यांना देण्यात आला तरी त्याच्या कडून जास्त आर्थिक लूट करणाऱ्या ई –महासेवा केंद्रावर कडक कारवाई करण्यात यावे ज्या महा ई सेवा केंद्रात दर फलक लावले नाहीत त्यांना सक्ती करण्याचं आश्वासन अधिकारी कडून देण्यात आले, ई –महा सेवा केंद्रावर कारवाई नाही झाल्यास वंचित बहुजन आघाडी अक्कलकोटच्या वतीने ई –महा सेवा केंद्रा ला कुलूप लावण्यात येईल व तहसीलदार ऑफिस समोर बोंबा बोंब आंदोलन करण्याचे गंभीर इशारा तालुका अध्यक्ष श्री चंद्रशेखर मडीखांबे यांनी दिले यावेळी निवेदन देताना सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष देवानंद अस्वले,तालुका महासचिव नागेश हरवाळकर, शहर अध्यक्ष विशाल ठोंबरे, शहर महासचिव भारत देडें शहर उपाध्यक्ष शिवाजी चौघुले सम्यक विधार्थी आंदोलन चे प्रमुख रवि पोटे युवक तालुका अध्यक्ष प्रकाश शिंदे शहर युवक महासचिव डॉ.मणियार साहेब व इतर कार्यकर्ते उपस्थीत होते.

# चक्क टाकळीवाडीतील बाजीराव गोरे समाजसेवक करताहेत निस्वार्थपणे गावाला पाणीपुरवठा करतात



पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे गावाला नदी नाही. अशातच यावर्षी पावसाने दांडी मारल्यामुळे गावातील ,विहीर ,बोर यांना पाणी कमी आले आहे. काही जणांची बोर, विहीर बंद पडली आहेत. गावामध्ये पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनलेला आहे. समाजसेवक बाजीराव गोरे या समाजसेवकांनी स्वतः टँकर भाड्याने आणून श्री गुरुदत्त शुगर्स लिमिटेड टाकळीवाडी च्या सहकार्याने गावाला पाणीपुरवठा करत आहे.आणि विशेष म्हणजे जेवढे पाणी हवे तेवढे तेवढा पाणीपुरवठा घरोघरी जाऊन करतायेत. टँकरला मोटर लावण्याची सुद्धा परवानगी दिलेली आहे.

सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे श्री गुरुदत्त शुगर्स लिमिटेड टाकळीवाडी चे चेअरमन मा.श्री.महादेवरावजी घाटगे (साहेब )व एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर मा.राहुल घाटगे (दादा)नेहमी सामाजिक बांधिलकी जपतआहे.

माजी सरपंच सौ चंद्रकला बाजीराव गोरे यांच्या कारकिर्दीत कोरोना काळात सुद्धा यांनी मोलाचे योगदान केले होते.गावामध्ये कोणतीही अडीअडचणी असो लगेच मदतीला धावून येतात. हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. स्वतःहे टँकर बरोबर घरोघरी फिरत असून पाणी घ्या पाणी अशी हाक देत आहेत.यांचे कौतुक होत आहे.महिलांना जो पाण्यासाठी संघर्ष करावा लागत होता तो थांबलेला आहे. महिला वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे. समाजसेवक असावा तर असा अशी महिलांच्या तोंडातून शब्द येत आहेत.


# सुयश इन्फोटेक व सद्गुरु बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योगा दिवस साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधीः सुयश इन्फोटेक व सद्गुरु बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुयश इन्फोटेक येथे २१ जून जागतिक योगा दिवस साजरा करण्यात आला. यदांच्या २०२३ च्या आंतरराष्ट्रीय योगा दिनाची थीम मानवतेसाठी योग अशी आहे त्यानुसारच जागतिक योगा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसमवेत सद्गुरु बहुउद्देशीय व सुयश इन्फोटेकच्या सर्व टीमने मिळून योगा दिवस साजरा केला .आजच्या कार्यक्रमाचे योगा प्रशिक्षक लता कुंभार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगून योगामध्ये सूर्यनमस्कार, शवासन ,ताडासन, हस्तताडासन वीरभद्रासन ,त्रिकोणासन, वक्रासन, पार्श्वकोमासन, शीर्षासन ,उग्रासन यासारखे योगाचे प्रकार शिकवले. तसेच योगाचे महत्त्व सांगताना शारीरिक व्याधी कमी होते ,आत्म शुद्ध होते ,मन शांत राहते. विद्यार्थ्यांचा शारीरिक –मानसिक –भावनिक विकास होण्यास मदत होते .तसेच मानवाचे सत्वगुण ,रजवूण ,तमगूण संतुलित होते .तान तणावापासून मुक्त होऊन आनंदी जीवन जगण्यास मदत होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संचालिका शितल कटारे मॅडम यांनी आम्हास मार्गदर्शन केले. सद्गुरू बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष भाग्यश्री वंजारे यांनी योगाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कशा पद्धतीने होतो व त्याचे मानवी जीवनातील महत्त्व सांगितले.

आभार प्रदर्शन शुभांगी लचके मॅडमनी केले. कार्यक्रमास संचालिका शितल कटारे,विजया खमितकर, सद्गुरू बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष भाग्यश्री वंजारे, योगा प्रशिक्षिका लता कुंभार शुभांगी लचके मॅडम उपस्थित होते.

# शब्दकोडे क्र ३८



आडवे शब्द १.सुलभ मिळालेले,कष्ट न घेता ३.गुजरातमधील एक प्रसिद्ध शहर ५.गोलमाल चित्रपटाचा नायक ९.किंमत,भाव १०.कारण,निमीत्त १२.सूर्य,दही घुसळण्याचे साधन १३.२६जानेवारी १६.जहाजात वापरण्यात येणारे एक दिशा दाखण्याचे यंत्र १९.धाक,जरब २१.हिसका,दचका २३.रात्री घातलेली पाळत २४.आंब्याचा रस २६.रमरम उलटे करा ३०.इंग्रजीत झाड ३१.क्रौच,एक पक्षी ३३.फणसाची एक जात ३६.पुरे,बेस्टचे एक वाहन ३७.दणकट,राकट ३९.एक मोठा व सुस्त साप ४०.चाट,थाप ४२.ज्याला वारीस नाही असा हिंदीत ४४.पाठवणी,बिदागी ४५.हिंदीत कालचा ४६.अफुचे बी ४८.संत,महंत ४९.मगर ५१.कमीत कमी ५३.एक ताणला जाणारा पदार्थ ५४.काजळ,अंजन हिंदीत ५५.मातीसारखी चव असेलेले ५७.ताजा,तवाना ६०.धारण करणारा ६१.मध ६३.विश्व ६४.संक्रांतीला स्त्रीया हे लुटतात ६५.लहान मुलींचा फ्रॉक ग्रामिण ६७.पावा,बासरी ७०.कढविलेला ऊसाचा रस ७२.मोहन उलटे करा ७३.आरंभ,श्रीगणेशा ७५.हरवणे,गडप ७६.घोडयाला काबुत ठेवण्यासाठी आवश्यक ७७.रानातला मेवा ७८.अजय देवगण,करीश्मा कपुर,जीवन,परेश रावल यांचा एक चित्रपट

उभे शब्द १.सडक,आँखे आदी चित्रपटात खलनायक तथा हास्यकलाकाराचे काम करणारा एक नट २.अमिताभ बच्चन,किमी काटकर यांचा 'जुम्मा चुम्मा'या गीताचा चित्रपट ३.बरकत,भरभराटीचा काळ ४.त्रास,यातना ५.शेवट,अंत ६.मुलगा हिंदीत ७.हात,हस्त ८.आठवडयातील सुटीचा वार १०.शासन,शिक्षा ११.बहुजन समाजवादी पार्टीचे संक्षिप्त रूप १३.धडा,पाठ,मामला १४.कारल्याची चव,कडवट १५.वस्तु,पर्वत १६.संमती कळवणे,मान्य १७.इंग्रजीत तरूणासारखा १८.त्रासलेला २०.स्वयंपाक घरातील एक साधन २२.वीस उभेचे उत्तर २५.पाण्याचा संतत पडणारा बारीक प्रवाह २७.कामदेव,रतीपती २८.एक उंच उडणारा पक्षी ३१.सोन्याची परीक्षा,सत्व ३२.मोठा विळा ३३.चांगला,भला ३४.लोखंड साफ करण्याचे साधन ३५.प्रायव्हेट मराठीत ३६.सुबत्ता,भरभराट ३७.धाण्याचा तुरा ३८.समाप्त हिंदीत ३९.सतत,अखंड ४०.महाभारतातील एक राक्षस ४१.जमीन साफ करण्याचे एक शेतकी साधन ४३.खाली,रिक्त ४७.एक मराठी आडनाव ४८.सोबत रांगेत बसुन जेवणे ५०.मनाची तृप्ती ५१.किडा,कृमी ५२.रोख,पैसे देऊन ५४.मुलगा,धागा ५५.वानर,कपी ५६.इंदिराजींच्या आईचे नाव ५८.वाळुच्या रेघावरून शकुन पाहण्याची एक क्रिया ५९.गाण्याचा सराव ६२.रंजन करणारे ६३.जामीन घेणे,हमी ६४.गाईचे बाळ ६६.गाजावाजा,बोभाटा ६७.ज्याचे मोल करता येत नाही असे ६८.हिंदीत दास,अमीर खान,राणी मुखर्जी यांचा 'आती क्या खंडाला' गाण्याचा चित्रपट ६९.पडणे,ऱ्हास ७०.चिंता,फिकीर ७१.इंग्रजीत विजेता ७३.मुलाची बायको ७४.पवन,वात

# शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी भरती प्रक्रिया सुरू करा

## राज्य शिक्षण संस्थाचालक महामंडळाची मुंबई येथे बैठकीत मागणी



निफाड/राजेंद्र थोरात : शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी भरती प्रकिया तत्काळ सुरू करा . महाराष्ट्र राज्य संस्थाचालक महामंडळाचा निणय . माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरती वरिल बंदी त्वरीत उठवून भरती सुरु करावी यासाठी संस्था महामंडळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या सोबत बैठक घेऊन भरतीचे सर्व अधिकार संस्था चालकांना द्यावे . असी मागणी . मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या कार्यकारिणी बैठकीत करण्यात आली.

महामंडळाच्या अध्यक्षा खासदार सुप्रीयाताई सुळे यांच्या अध्यक्षतेखाली व महामंडळाचे कार्याध्यक्ष माजी मंत्री विजय नवल पाटील.आमदार चिमणराव पाटील.चंद्रकांत रघुवंशी यांच्या मार्गदर्शना खाली झालेल्या सभेत शाळांना वेतनेत्तर अनुदान थकीत वेतना सह १२% देणे, न्यायालयीन प्रकारणाचा आढावा घेणे , चतुर्थ श्रेणी कर्मचारी भरती व त्यांच्या मानधनात वाढ करणे, राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांत रूप टॉप सोलर बसविणे, भरती बाबतचे सर्व अधिकार संस्था चालकांना देणे, शासनाच्या प्रत्येक शैक्षणिक निर्णयात संस्था चालक महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेणे , शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी ३६ शिक्षणाधिकाऱ्यांच्या चौकशा लावल्या त्याचे अभिनंदन करणे . नविन शैक्षणिक धोरणाची काटेकोर पणे अ अंमल बजावणी करणे, या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली . या वेळी संस्थाचालक महामंडळाचे उपाध्यक्ष – अशोक थोरात, वसंतराव घुईखेडकर, विजय गव्हाने , कार्यवाह रविन्द्र फडनविस , मिलींद पाटील, गणपतराव बालवाडकर, विनय राऊत, शिवाजी माळकर , आनिल शिंदे, आमदार किरण सरनाईक, वसंतराव जवळकर , नितीनभाऊ ठाकरे , कोंडाजी मामा आव्हाड नाशिक व नगरचे समन्वयक एस . बी . देशमुख, रामचंद्र जाधव, एन .डी . नांद्रे हे कार्यकारिणी सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते .


# जिल्हा परिषद शाळा कुमार विद्या मंदिर टाकळीवाडी येथे शिक्षक नेमणूक करणे बाबत गट शिक्षणाधिकारी यांना निवेदन

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर येथे शिक्षक संख्या कमी आहे.येथे पहिली ते सातवी पर्यंत एकूण विद्यार्थी ,विद्यार्थीनी, २६० आहेत. शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांची तारांबळ उडाली आहे. या शाळेतील विद्यार्थी गुणवंत आहेत.विद्यार्थ्यांना शिक्षक नसल्यामुळे त्यांचा अभ्यासावर परिणाम होत आहे. विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे नुकसान होतआहे. शिक्षक भरती त्वरित करावी या मागणीसाठी निवेदन शिक्षणाधिकारी सौ भारती कोळी, गट विकास अधिकारी मा. शंकर कवितके साहेब, शिक्षणाधिकारी श्री कामत साहेब यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देताना बाबासाहेब वनकोरे (माजी सरपंच), कुशाल कांबळे (माजी तंटामुक्त अध्यक्ष, माजी सरपंच), शालेय समिती अध्यक्ष सौ शुभांगी खोत, शालेय समिती सदस्य तुकाराम खोत, कृष्णा खोत, संतोष चिगरे, संतोष कांबळे,निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली. त्वरित शिक्षक नेमणूक करावे या मागणीसाठी जोर धरला.



# न्यास उत्तमरित्या चालवीत असल्याने विकासाची घोडदौड : नाना भाऊ पटोले



अक्कलकोट/प्रतिनिधी: श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले हे न्यास उत्तमरित्या चालवीत असल्याने विकासाची घोडदौड पाहायला मिळत असल्याचे मनोगत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी व्यक्त केले.ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना नानाभाऊ पटोले म्हणाले की, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची कार्य भक्ताभिमुख असल्याने आलेल्या स्वामी भक्त हा न्यासाला भेट देऊन महाप्रसाद घेतोच, भक्तांसाठी केलेल्या आवश्यक सोयीसुविधा ह्या गरज ओळखून मांडणी करण्यात आलेले आहे. म्हणूनच संपूर्ण परिसर हा सुंदर स्वच्छ असल्याचे ते म्हणाले.

त्यांच्या समवेत माजी गृह राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, कांग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, ताईसाहेब पटोले, प्रियांका पटोले, राहुल पटोले, शीतलताई म्हेत्रे, प्रथमेश म्हेत्रे, शहर कांग्रेस कमिटीचे अध्यक्ष रईस टीनवाला, अशपाक बळोरगी, लाला राठोड, सद्दाम शेरीकर, काकासाहेब कुलकर्णी, भीमाशंकर जमादार, विजयकुमार हत्तुरे, आनंदराव सोनकांबळे, सुधीर लांडे, अभिराज शिंदे, भीमराव बाळगे, रमेश हसापुरे, चांद आळंद, शिवू स्वामी, संजय विभूते, विश्वनाथ हडलगी, शिवशरण इचगे, बाबा पाटील, फारुख बबरची, अशपाक अग्सापुरे, विनीत पाटील, शादिद वळसंगकर, लखन तांबोळी, रामचंद्र समाणे, रवी वरनाळे, हाजीम अत्तार, दिरज पाटील, सिध्दार्थ गायकवाड, मैनुद्दिन कोरबू, मुबारक कोरबू, सिध्दाराम भंडारकोटे, सरू शेख, महिबूब फरास, नंदू स्वामी हे उपस्थित होते. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, पुरोहित अप्पू पुजारी, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, गोटू माने, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# ‘शासन आपल्या दारी’ मेळाव्यात वैयक्तिक योजनांचा लाभ देण्याची पूर्वतयारी करावी : जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख

पुणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पुरंदर येथे ३ जुलै रोजी ‘शासन आपल्या दारी’ अभियानांतर्गत मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार असून लाभार्थ्यांना वैयक्तिक योजनांचा लाभ देण्यासाठी सर्व यंत्रणांनी पूर्वतयारी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी दिले.मेळाव्याच्या आयोजनाच्या पूर्वतयारीसाठी दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आणि जिल्ह्यातील विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.




जिल्हाधिकारी म्हणाले, जिल्ह्यातील प्रत्येक गावनिहाय लाभार्थी निवड करावी व त्यांना वैयक्तिक अर्थसहाय्याच्या योजनांचा लाभ देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. मेळाव्याच्या आयोजनासाठी आवश्यक सुविधांचीदेखील पूर्वतयारी करावी. सूक्ष्म नियोजन करून मेळाव्याच्या ठिकाणी लाभार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध होतील याची दक्षता घ्यावी. मेळाव्याच्या तयारीबाबत दररोज आढावा घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.लाभार्थ्यांना विशेष सहाय्य योजनांचे लाभार्थी शोधून त्यांना लाभ देण्यासाठी आवश्यक प्रक्रीया पूर्ण करावी. कृषि विभाग आणि पशुसंवर्धन विभागाने शेतकऱ्यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी आवश्यक नियोजन करावे. मेळाव्यासाठी समन्वयक अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, असेही जिल्हाधिकारी म्हणाले.

श्री. आयुष प्रसाद म्हणाले, जिल्हा परिषदेतर्फे २२ हजार दिव्यांगाना लाभ देण्याचे नियोजन आहे. कृषि विभागाच्या माध्यमातून १ हजार ७०० आणि ७ हजार घरकूलाच्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात येणार आहे. महाडीबीटीच्या माध्यमातून कृषि, महिला व बालविकास आणि समाज कल्याण विभागाच्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून १३ प्रकारचे दाखले देण्यासाठी पुढील १५ दिवसात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. गावपातळीवर पशुसंवर्धन व आरोग्याचे मेळावे घेण्यात येणार आहेत. सरपंच आणि ग्रामसेवकांची बैठक घेवून आवश्यक नियोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. श्रीमती कदम म्हणाल्या, मेळाव्याच्या ठिकाणी मतदार नोंदणी आणि आधार कार्डच्या सुविधेबाबत व्यवस्था करावी. विविध योजनांअंतर्गत घरकूलाचे वाटप, आरोग्य योजनांचा लाभ देण्यासाठी संबंधित विभागाने पुढाकार घेवून कार्यवाही करावी. जिल्हा अग्रणी बँकेमार्फत मुद्रा बँक कर्ज, क्रेडीट कार्ड वाटप आदी योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न करावा. मेळाव्यात लाभार्थ्यांना लाभ देण्याच्यादृष्टीने आवश्यक सर्व कार्यवाही संबंधितांनी करावी. योजनेच्या नावाप्रमाणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना लाभ देण्याचा प्रयत्न करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी वैयक्तिक लाभाच्या योजनेचा नागरिकांना लाभ देण्याबाबत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली.

अधिकाऱ्यांनी योजना आणि तालुकानिहाय लाभार्थ्यांची माहिती सादर करावी, असेही श्रीमती कदम यांनी सांगितले.कौशल्य विकास विभागातर्फे रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. आभा कार्ड, प्रधानमंत्री मातृवंदना योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. नगरपालिकांच्या माध्यमातूनही विविध योजनांचा लाभ देण्यासाठी नियोजन करण्यात येत असल्याची माहितीही यावेळी देण्यात येईल.

# ईटकुर मध्ये शेतकऱ्याला न्याय देऊन मंडल अधिकाऱ्याची धडाकेबाज कामगिरी

कळंब/प्रतिनिधी :कळंब तालुक्यातील ईटकुर शिवारातील गट नंबर ३१४/३७० चा शेत रस्ता खुला करण्यासाठी अनेक दिवसापासून प्रलंबित पडला होता. हा प्रश्न निकाली काढण्यासाठी शेतकरी अर्जदार राजकुमार हनुमंत अडसूळ यांनी ईटकुर ते पंढरपूर पायी आंदोलन करणार असे निवेदनाद्वारे प्रशासनाला कळविले होते. परंतु या पायी आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने या आंदोलनाची दखल घेत कित्येक वर्ष स्थगित झालेला हा प्रश्न मार्गी लावण्यात आला. ईटकुर चे मंडळ अधिकारी सौ, प्रणिता दराडे मॅडम यांच्या धडाकेबाज कामगिरी ने आपल्या अधिकाराचा वापर करून या शेतकऱ्यांना न्यायदान देण्याचे काम केले. यावेळी इटकुरचे बीट अंमलदार पोलीस कॉन्स्टेबल तांबडे साहेब, तलाठी पालके, तंटामुक्तीचे अध्यक्ष राजाभाऊ अडसूळ, इटकुर चे पोलीस पाटील सोमनाथ जगताप, व आजूबाजूचे सर्व इतर शेतकऱ्यांच्या उपस्थितीत या शेत रस्त्याचे काम करण्यात आले.




# श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा २७ जून रोजी

पुणे/प्रतिनिधी: विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, श्री क्षेत्र आळंदी-देहू-पंढरपूर परिसर विकास समिती आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि.२७ जून २०२३ रोजी दुपारी १.३० ते संध्याकाळी ७.३० वाजेपर्यंत श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा पंढरपूर, वाखरी येथील पालखी तळाच्या शेजारी, विश्वशांती गुरुकुल परिसरात होणार आहे. वारकर्यांनी जास्तीत जास्त संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड व वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव विलास कथुरे यांनी केले आहे.स्पर्धेचे उद्घाटन उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष उल्हास पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. तसेच, हिंद केसरी दिनानाथ सिंग, हिंद केसरी जगदीश कालीरमण, महाराष्ट्र केसरी अप्पासाहेब कदम, पंढरपुरचे आमदार समाधान आवताडे व महाराष्ट्र राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री बबनराव पाचपुते हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र आळंदी देहू पंढरपूर परिसर विकास समितीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील.आयोजित स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वारकरी मल्लांनी २७ जून २०२३ रोजी सकाळी ७.३० वा. विश्वशांती गुरूकुलच्या मुख्य प्रवेश द्वाराजवळ आपली नावे नोंदणी करावी. सोबत वयाचा पुरावा म्हणून आपले आधार कार्ड किंवा शासनमान्य ओळखपत्र ठेवावे. अधिक माहितीसाठी डॉ.पी.जी.धनवे मो.नं. ९८२२६२६००६ व श्री. विलास कथुरे मो. नं. ९८५०२११४०४ यांच्याशी संपर्क साधावा.विशेष आकर्षण म्हणजे योगमहर्षी वै. रामचंद्र गोपाळ शेलार

| वयोगट | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|
| १६ ते २५ वर्षे | रु. ४,०००/- | रु. ३,०००/- | रु. २,०००/- |
| २६ ते ३५ वर्षे | रु. ५,०००/- | रु. ४,०००/- | रु. ३,०००/- |
| ३६ ते ४५ वर्षे | रु. ६,०००/- | रु. ५,०००/- | रु. ४,०००/- |
| ४६ ते ५५ वर्षे, | रु. ७,०००/- | रु. ६,०००/- | रु. ५,०००/- |
| ५६ ते ६५ वर्षे | रु. ८,०००/- | रु. ६,०००/- | रु.५,०००/- |
| ७० वर्षांच्या पुढे | रु. ५,०००/- | रु. ३,०००/- | रु.२,०००/- |

(प्रथम - सुवर्ण पदक, द्वितीय - रौप्य पदक, तृतीय - कांस्य पदक व रोख रक्कम)

उर्फ शेलारमामा यांच्या स्मृति प्रित्यर्थ तंदुरूस्त अशा सत्तर (७०) वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी याच दिवशी आगळी वेगळी कुस्ती स्पर्धा होईल.

१६ ते २५ वयोगटातील विजेत्यास ‘कुमार वारकरी कुस्ती महावीर’ पुरस्कार, ५६ ते ६५ वयोगटातील विजेत्यास ‘वारकरी कुस्ती महावीर’ पुरस्कार आणि ७० वर्षांच्या पुढील विजेत्यास ‘ज्येष्ठ वारकरी कुस्ती महावीर’ पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. विजेत्या कुस्ती महावीरांचा सन्मान - मानाचा फेटा, माऊलींची/जगद्गुरुंची प्रतिमा, शाल, स्मृतिचिन्ह, सुवर्ण/रौप्य/कांस्य पदक व रोख रकमेची बक्षिसे देऊन गौरव करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील या लोककलेला परत संजीवनी मिळावी म्हणून याच दिवशी रात्री ८.०० ते ११.०० वाजेपर्यंत, वारकर्यांना अत्यंत प्रिय असलेल्या शांती ब्रह्म संत एकनाथ महाराजांचे प्रसिध्द असलेले नाथांचे भारूड व गवळणी ही स्पर्धा डॉ. संजय उपाध्ये व ह.भ.प. सुदाम महाराज पानेगावकर यांच्या उपस्थितीत घेण्यात येणार आहे.

# सोलापूर जिल्हामध्ये ‘बार्टी’ संस्थेचे संविधान दिंडीचे स्वागत

सोलापूर/प्रतिनिधी: सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सोलापूर जिल्हामध्ये ’ बार्टी ’ संस्थेचे संविधान दिंडीचे स्वागत करण्यात आले.सुमंतजी भांगे (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन) यांच्या मुख्य संकल्पनेतुन व आयुक्त डॉ. प्रशांतजी नारनवरे (समाज कल्याण विभाग) व सुनिलजी वारे (महासंचालक, बार्टी) यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचेमार्फत संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर यावर्षी ही संविधान दिंडी चे आयोजन करण्यात आले आहे.महाराष्ट्रातील आराध्य दैवत संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान आषाढी वारीस शनिवारपासून सुरुवात होत आहे. देहू आळंदीत राज्याच्या कानाकोपऱ्यातून दिंड्या दाखल होत आहेत. या अनुषंगाने बार्टीचा संविधान रथ ही सज्ज झाले आहे. आषाढी वारी पालखी सोहळ्यात यंदा वारकऱ्यांचा - प्रचंड उत्साह दिसून येत आहे. गुरुवारी सायंकाळी नातेपुते येते संविधान रथ आला असता विविध सामाजिक संस्थेच्या वतीने संविधान रथाचे स्वागत करण्यात आला.बार्टीकडून पालखी सोहळ्यात संविधान दिंडीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येते ’बार्टी’कडून पालखी सोहळ्यात संविधानविषयक प्रबोधन करण्यासाठी संविधान रथ सजविण्यात येते सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग महाराष्ट्र शासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन



व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान दिंडीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

वारकरी बांधवांना भारतीय संविधानाची माहिती व्हावी, आपले अधिकार, कर्तव्याची जाणीव व्हावी तसेच संतांच्या समतावादी विचारांचा प्रसार व्हावा हा या संविधान दिंडीचा हेतू आहे. भारतीय संविधानाबद्दल तीन प्रश्न विचारून विजेत्यांना भारतीय संविधानाची प्रत, संविधान प्रास्ताविका भेट देऊन सन्मानित करण्यात येत आहे. वारकरी बांधवांना भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाटप करून त्यांना भारतीय संविधानाबद्दल आपल्या मुलभूत अधिकार व कर्तव्याची माहिती देण्यात येत आहे.

वारकरी बांधव व नागरिकांना संविधानाच्या प्रास्ताविकाचे व बार्टी घडी पत्रिकेचे वाटप करून संविधान दिंडीचे महत्त्व विशद करण्यात येते. संविधान चित्ररथास वारकऱ्यांचा आणि नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असतो. वारकरी दिंडी च्या मार्गाने वारकऱ्यांच्या विसाव्या ठिकाणी प्रबोधनात्मक, संविधान आधारित विविध उपक्रम, कार्यक्रम, शाहिरी जलसा यांचे आयोजन करण्यात येते. संविधान दिंडीमध्ये बार्टीचे निबंधक इंदिरा अस्वार, विभाग प्रमुख श्रीमती स्नेहल भोसले,डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण, रवींद्र कदम, आरती भोसले, सतिश पाटील, अनिल कारंडे, कार्यालयीन अधीक्षक संध्या नारखेडे, सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक नसरीन तांबोळी, प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे व कॅमेरामन राहुल कवडे, तांत्रिक विभागातील राहुल ढसाळ, सुरक्षा रक्षक, वाहनचालक, तसेच समतादूत यशपाल चंदनशिवे, किरण वाघमारे, मुकुंद लोंढे, नालंदा चंदनशिवे, ज्योती ओव्हाळ यांचा समावेश असतो. प्रमुख उपस्थिती मा.शाहिर खाडे दिपक किसनराव कंकाळ (कनिष्ठ अभियंता महापारेषन) यांचे हस्ते नातेपुते येथे संविधान दिंडी चे स्वागत करण्यात आले. एन.के.साळवे (आर.पी.आय सोलापूर जिल्हा अध्यक्ष) सदानंद व्हटकर (सेक्शन लीडर होमगार्ड विभाग सोलापूर) विनायक सावंत अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर मल्टीपर्पज सोसायटी नातेपुते आदी ने स्वागत केले



# जिल्हा परिषद शाळा कुमार विद्या मंदिर टाकळीवाडी येथे ग्रामपंचायतकडून पाण्याची सोय

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर येथे पाणीटंचाई भासत आहे. पाण्याची भयंकर समस्या जाणवत आहे. एकूण या शाळेमध्ये पहिली ते सातवी पर्यंत एकूण २६० विद्यार्थी, विद्यार्थिनी आहेत. व मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका आहेत.

मुलांसाठी पिण्याची सोय व जेवणाचे ताट धुण्यासाठी सुद्धा पाणी नव्हते. विद्यार्थी घरातूनच दोन-तीन बाटल्या पिण्यासाठी पाणी घेऊन येत होते. दप्तरापेक्षा पाण्याच्या बाटल्या जास्त ओझे झाल्या होत्या.ग्रामपंचायत कडून या शाळेमध्ये टँकरद्वारे पाण्याची सोय करण्यात आली. सर्व विद्यार्थी खुश झाले आहेत. घरातून ओझे पाण्याची बाटली आणण्याचे काम हलके झाले.पालक वर्गातून मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका यांच्याकडून ग्रामपंचायतच कौतुक केले जात आहे

# जनता विद्यालय नांदुर्डी येथे जागतिक ऑलम्पिकदौड दिन उत्साहात साजरा



निफाड/राजेंद्र थोरात :आज जागतिक ऑलम्पिक दौड दिन संपुर्ण जगभरात साजरा होत असुन निफाड तालुक्यातील नांदुर्डी येथिल जनता विद्यालयात ही.विद्यालयाचे प्राचार्य श्री.डावरे डी.ए यांच्या मार्गदर्शनाखाली उत्स्फूर्तपणे साजरा करण्यात आला. याप्रसंगी सरस्वतीच्या प्रतिमेची पूजन नांदुर्डी ग्रामपंचायत सरपंच सौ जयश्रीताई जाधव व स्कूल कमिटी अध्यक्ष श्री बोराडे तात्या,व एकनाथ निकम व डावरे.डी ए पर्यवेक्षक श्री बिन्नर बी. पी. सर व सर्व शिक्षकांनी करून ऑलम्पिक स्पर्धेचे उद्घाटन केले याप्रसंगी क्रीडा प्रमुख श्री गडाख सर यांनी ऑलम्पिक दिनाचे महत्त्व स्पष्ट करून त्यांचे जीवनातले महत्त्व सांगितले तसेच प्रज्ञा निफाडे व वैष्णवी आहेर यांनी आपले मनोगत व्यक्त केले

विद्यालयाचे उपशिक्षक क्रीडाप्रमुख श्री गडाख सर, व सर्व शिक्षकांनी या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करून ऑलम्पिक दिन साजरा केला यामध्ये जुनियर कॉलेज सर्व विद्यार्थी व शिक्षक माध्यमिक सर्व विद्यार्थी व शिक्षक व अभिनव बाल विकास मंदिर सर्व विद्यार्थी व शिक्षक यांनी ऑलिंपिक दौड दिनानिमित्त सहभाग घेतला *सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सर्व विद्यार्थी, व ग्रामस्थ या कार्यक्रमासाठी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांचन कांदळकर या विद्यार्थिनीने केले